स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या शाखेतंर्गत मराठी विषयाच्या पीएच.डी. पदवीसाठी

सादर करण्यात येणारा शोधप्रबंध आराखडा.

:: संशोधन शीर्षक ::

नारायण सूर्वे यांच्या समग्र साहित्यातील समाज दर्शन : एक चिकित्सक अभ्यास.

❈ संशोधक ❈

मीनाक्षी गंगाधर कांबळे

एम.ए, बी.एड्.एम.फिल (मराठी)

❈ मार्गदर्शक ❈

डॉ माधव बसवंते

राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड, जि. नांदेड

नोव्हेंबर - 2017

नारायण सुर्वे यांच्या समग्र साहित्यातील समाजदर्शन : एक चिकित्सक अभ्यास.

प्रस्तावना :

मराठी साहित्यविश्व हे अतिशय समृद्ध आहे. विविध वाड्.मय प्रकारांनी या साहित्य विश्वाला समृद्ध बनवले आहे. विविध वाड्.मय प्रकारापैकी कविता हा मूलभूत साहित्य प्रकार आहे. कवितेच्या माध्यमातून कमीत कमी शब्दात व्यक्त होता येते. सर्वसामान्य व्यक्तीच्या भावना व्यक्त करण्यासाठी कविता हे अतिशय प्रभावी साधन आहे.

मराठी कवितेची वाटचाल पाहताना त्यात प्राचीन व अर्वाचीन कविता असे कालखंड पाडले जातात. अर्वाचीन म्हणजेच आधुनिक कालखंडातील विविध कवीपैकी एक युगपप्रवर्तक कवी म्हणून नारायण सुर्वे यांचे नाव मराठी साहित्य प्रांतात कायमचे कोरले गेले. मी शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेताना नारायण सुर्वेच्या कविता अभ्यासक्रमात समाविष्ट होत्या. माझे पदवीचे शिक्षण मराठी साहित्यात झाल्यामुळे नारायण सूर्वेच्या कविता मी अभ्यासल्या. आणि मी कवी नारायण सुर्वे यांच्या साहित्याकडे आकर्षित झाले. म्हणनूच सुर्वेची कविता माझ्या अंत:करणाला अतिशय भिडल्या. इ.स. 1960 नंतरच्या काळातील समाज असहाय्यतेने व असुरक्षिततेने ग्रासलेल्या अवस्थेत असताना एक आशेचा व लढ्याचा सूर असलेली सुर्वेची कविता समोर आली. एक अग्रगण्य कवी, कामगार कवी लोककवी, मानवतावादी कवी, मार्क्सवादी कवी, समाजवादी कवी अशा अनेक नावांनी सुर्वेनी आपले नाव साहित्य विश्वात निर्माण केले. सुर्वेची कविता ही बदलाची भाषा बोलणारी आहे. सर्व सामान्य साध्या व सरळ भाषेत व्यक्त होणारी त्यांची कविता आहे. सुर्वेनी आपल्या कवितेतून कामगार, दीन-दलित, पीडित, वेश्या स्त्री, वंचित आणि उपेक्षित लोकांच्या व्यथा वेदनेचे दर्शन दिले आहे. समाजातील अन्याय, अत्याचार, शोषण, जातियता, विषमता याविरुध्द संताप व चीड व्यक्त करत त्यांनी विषम समाज व्यवस्थेवर अनेक कठोर हल्ले केले. मानवतावादी नव्या युगाचा जाहिरनामा मांडून त्यांनी समग्र परिवर्तनाची दिशा स्पष्ट केली.

नारायण सुर्वे यांनी ऐसा गामी ब्रम्ह (1962), माझे विद्यापीठ (1966), जाहीरनामा (1975), नव्या माणसाचे आगमन (1995), या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून त्यांनी समाजाला समानतेचा संदेश दिला, तसेच नवीन युग परिवर्तनाचा ध्यास दिला. दलित कुटुंबात वाढलेल्या सुर्वेनी समाजातील कामगार वर्ग, दु:खी, कष्टी वर्गाचे अनुभवातून लेखन केले. सुर्वेनी जे अनुभवले, पाहिले, ते सर्व प्रखरपणे अनुभवाच्या लेखनीने काव्य विश्वात प्रकट केले. अन्याय, अत्याचाराच्या चिखलात रुतून बसलेल्या समाजाचे दु:ख,व्यथा,वेदना प्रखरपणे साहित्यातून मांडले. अन्याय अत्याचारातून दृष्ट चक्रातून बाहेर येण्यासाठी रोख, ठोक भूमिका घेऊन त्यांनी मराठी काव्याला वास्तवाचे आत्मभान दिले. समाजातील मालक व कामगार या विषम समाज व्यवस्थेचे अमानुष स्वरुप विदारकपणे कवितेतून मांडले आहे.

संशोधनाचा हेतू :

संशोधन कार्य करत असतांना जो हेतू समोर ठेऊन नारायण सुर्वे यांच्या समग्र साहित्याच्या समाजदर्शनाचा प्रस्तुत ठिकाणी जो शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. तो इतर संशोधनापेक्षा निश्चितच वेगळा आहे. ते वेगळेपण पुढीलप्रमाणे थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. वंचितांना दिली जाणारी अपमानास्पद वागणूक, त्यांच्या समस्या समाज वास्तवाची जी धग सुर्वेच्या साहित्यातून समोर आली आहे याचा प्रकर्षाने शोध घेणे हा संशोधनाचा हेतू आहे. तसेच शोधप्रबंधाच्या अभ्यासामधून सुर्वेचे मराठी सारस्वतातील स्थान व महत्व शब्दांकित करण्याचा प्रयत्न करणे हाही संशोधनाचा हेतू आहे. कष्टकरी दैनंदिन दु:ख व यातनामय परंतु उज्ज्वल उदयासाठी आसुसलेल्या मनाचे दर्शन नारायण सूर्वेनी साहित्यातून केले. समकालीन कवितेतून मुंबईसारख्या महानगरातील वास्तवाचे चित्रण येते. सुर्वे यांच्या कवितेत हीच मुंबई वेगळ्या रुपात भेटते, मुंबई हे कामगारांचे, कष्टकरी लोकांचे शहर याची जाणीव त्यामागे आहे. सुर्वेनी कविता लेखन, संपादन लेखन, चरित्र लेखन, ललित लेखन, अनुवाद लेखन इत्यादी साहित्य प्रकारात मोलाचे योगदान दिले आहे. या सर्व प्रकारातून समोर येणाऱ्या मानवी समाजाचे दर्शन संशोधनातून अभ्यासणे योग्य वाटते.

संशोधन विषयाचे महत्व :

इ.स. 1960 नंतर समाजात अनेक सामाजिक व राजकीय स्थित्यंतरे घडून आली. अज्ञानी समाज दु:खाने ग्रासून गेला होता. नारायण सुर्वे यांनी वंचित उपेक्षितांचे दु:ख आपल्या साहित्यात मांडले, त्याचा सामजिक दृष्टिकोनातून अभ्यास व्हावे या संशोधन विषयाचे महत्व आहे.

कामगार वर्गाला, मालकाचा अपमान सहन करावा लागतो. अन्याय, अत्याचाराला तोंड द्यावे लागते हे सुर्वेच्या साहित्यातून आलेले समाजाचे वास्तव अभ्यासणे संशोधकाला योग्य वाटते. कवितेतून आलेले वेश्या स्त्रीचे चित्रण मन सुन्न करणारे आहे. स्त्रीच्या वाट्याला आलेली दु:ख अकारण तिला भोगावी लागतात. दुसऱ्यानी लादलेली दु:ख तिला पदोपदी सहन करावी लागतात. कवितेतून व्यक्त होणाऱ्या अशा समाजाचे दर्शन विविध अंगाने व्हावे योग्य असे वाटते.

या प्रबंधाच्या अभ्यासामधून सुर्वेचे मराठी सारस्वतातील स्थान, महत्व शब्दांकित करण्याचा प्रयत्न करणे, नारायण सुर्वे यांनी आपल्या साहित्यातून युग परिवर्तनाचा संदेश दिला आहे. समाज संघर्ष गतिमान होण्यासाठी सुर्वेचे साहित्य विश्व महत्वाचे आहे. एकूणच समाज दर्शनाच्या अंगाने नारायण सुर्वे यांच्या साहित्याचे संशोधन अद्याप झाले नाही, असे मला वाटते. त्यामुळे पीएच.डी. च्या शोधप्रबंधासाठी नारायण सुर्वे यांच्या समग्र साहित्यातील समाजदर्शन एक चिकित्सक अभ्यास हा प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत :

1. प्राचीन व अर्वाचीन कवितेची वाटचाल अभ्यासणे.
2. नारायण सुर्वे यांच्या साहित्यातून आलेल्या समाज जीवनाचा शोध घेणे.
3. नारायण सुर्वेच्या साहित्यातील स्त्री जीवनाचा शोध घेणे.
4. बदलत्या जाणिवेचा शोध घेणे.

5. नारायण सुर्वेच्या व्यक्तिमत्वाचा शोध घेऊन त्यांच्या प्रेरणांचा मागोवा घेणे.
6. साहित्याचा सामाजिक अंगाने अभ्यास करणे.
7. कामगार वर्गाचे साहित्यातील स्थान व वेगवेगळेपण तपासणे.
8. कवितेतील समाज जीवनाचे प्रश्न व समस्या यांची चर्चा करणे.
9. भाषिक वैशिष्ट्याची चर्चा करुन भाषेचे योगदान अभ्यासणे.
10. मार्क्सवादाच्या प्रभावाचा आढावा घेणे.
11. साहित्य लेखन तंत्रनिष्ठ नसून अनुभवनिष्ठ याचा प्रत्यय घेणे व कवी नारायण सुर्वे यांच्या समग्र वाड्.मयाचा गांभीर्याने विचार करणे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

संशोधनाची व्याप्ती केवळ नारायण सुर्वेच्या समग्र साहित्यापुरती मर्यादित आहे. प्रत्येक संशोधनाला संशोधन करतेवेळी अनेक बाबतीत मर्यादा पडतात. संशोधनाची व्याप्ती ही विशिष्ट भागापर्यंत असते.

सदर संशोधकाची व्याप्ती ही सुर्वेच्या साहित्यापुरती आहे. संशोधकाला मिळणारा वेळ, श्रम, पैसा या सर्व बाबीचा संशोधनावर परिणाम पडतो. संशोधकाला ठराविक संशोधन विशिष्ट अशा ठराविक कालावधीपर्यंत करावे लागते. विशिष्ट कालावधी असल्यामुळे श्रम कमी पडून मर्यादा जाणवते त्यामुळे संशोधकाला अनेक मर्यादा पडतात.

संशोधनाची साधने :

सदरील विषयानुषंगाने संशोधन कार्य करण्यासाठी संशोधनाची साधने म्हणून संदर्भग्रंथ, वाड्मयीन कोष, विशेषांक, नियतकालिके इत्यादीचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधन कार्यात नारायण सुर्वेच्या कविता,ललित लेखन, तसेच इतर साहित्याचा संदर्भग्रंथ म्हणून वापर करण्यात येणार आहे.

संशोधन कार्यात नारायण सुर्वेच्या कविता, ललित लेखन तसेच इतर साहित्याचा संदर्भ ग्रंथ म्हणून वापर करण्यात येणार आहे. तसेच संशोधनासाठी उपयोगी पडणाऱ्या अनेक लेखकांच्या ग्रंथाचा,पुस्तकांचा संदर्भ ग्रंथ म्हणून वापर करण्यात येणार आहे.

संशोधनाची गृहितके :

1. नारायण सुर्वे यांच्या साहित्यातून सामाजिक जाणीव व्यक्त होते आणि समाजातील वेदना स्पष्ट होतात.
2. नारायण सुर्वे यांच्या साहित्यातून उपेक्षितपणाचे जीवन सादर होते.
3. नारायण सुर्वे यांच्या साहित्यात समाजातील विषमता दिसून येतात.
6. न्याय, हक्क, समतेसाठी सामाजिक जाणीव व्यक्त होते.
7. सुर्वेच्या कवितेतून रुढी झुंगारल्याचे दिसते.
8. समाजातील अन्याय, अत्याचार स्पष्ट होतो.

संशोधन कार्यपद्धती :-

“नारायण सुर्वे यांच्या समग्र साहित्यातील समाजदर्शन :एक चिकित्सक अभ्यास” या संशोधनात समग्र साहित्य वृत्तीचे आशय विश्लेषण करणार आहे. तसेच त्यातून व्यक्त होणाऱ्या समाजाचे जीवन व्यक्त करण्यासाठी वर्णनात्मक, विश्लेषणनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करुन माहितीचा प्राथमिक स्त्रोत म्हणून नारायण सुर्वेच्या समग्र साहित्या बरोबरच माहितीचा दुय्यम स्त्रोत म्हणून विविध संदर्भग्रंथ, वाङ्.मय कोष, विशेषांक, नियतकालीकेचा वापर केला जाईल.तसेच सूर्वेच्या साहित्याचे स्थान व वेगळेपण निश्चित करण्यासाठी तुलनात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे.

प्रकरण योजना :

1) प्रकरण पहिले : प्राचीन व अर्वाचीन मराठी कविता: स्वरुप व वाटचाल

या प्रकरणात मराठी कवितेची समग्र वाटचाल याचा अभ्यास करावयाचा आहे. कवितेचे स्वरुप व वाटचाल यांचा आढावा घेणे, त्यासाठी प्राचीन कविता व अर्वाचीन कविता यातून संत काव्य, पंत काव्य, तंत काव्य तसेच केशवसूतपासून आधुनिक कविता उदयास आली. केशवसुत

पासुन आधुनिक कालखंड (1885) ते (1920), रवि किरण मंडळाचा काळ (1920) ते (1940),नवकाव्य कालखंड (1940) ते (1960) आणि (1960) नंतरचा कालखंड या टप्यातून मराठी कवितेच्या विकासाची वाटचाल या प्रकरणातून अभ्यासण्यात येईल.

2) प्रकरण दुसरे : नारायण सुर्वे : जीवन व कर्तृत्व

या प्रकरणात नारायण सुर्वे यांचे जीवन पाहताना बालपण, शिक्षण, नोकरी, विवाह, चळवळ, लेखन या टप्यातून अभ्यासावयाचे आहे. दलित कुटुंबात वाढलेले सुर्वे शिपाई ते शिक्षक हा प्रवास तसेच कामगारासाठीचा लढा, चळवळी या सर्वाचा आढावा या प्रकरणात अभ्यासावयाचा आहे.

3) प्रकरण तिसरे : नारायण सूर्वे यांची समग्र साहित्य संपदा

या प्रकरणात नारायण सुर्वे यांच्या संपूर्ण साहित्याचा अभ्यास करावयाचा आहे. यात ऐसा गा मी ब्रम्ह (1962), माझे विद्यापीठ (1960), जाहिरनामा (1975), नव्या माणसाचे आगमन (1995) हे कविता संग्रह, तसेच सनद, दलित काव्यसंग्रह , कविता श्रमाची, गाणी चळवळीची, कॉ. डांगे भारतीय राजकारणातील एक वादळ या साहित्याचे त्यांनी संपादन केले. तसेच तीन गुंड आणि सात कथा दादर पुलाकडची मुले या साहित्याचा केला या सर्वांची या प्रकरणात विस्तृतपणे मांडणी करावयाची आहे.

4) प्रकरण चौथे : नारायण सुर्वे यांच्या साहित्याची भाषाशैली

या प्रकरणात नारायण सुर्वे यांच्या साहित्यातील भाषा शैलीचा विस्तृतपणे अभ्यास करावयाचा आहे. रोखठोकपणे विचार मांडणारी त्यांची व सर्वसामान्य जनतेला बंड करुन उठण्यास भाग पाडणारी त्यांची भाषा शैली आहे. सुर्वेच्या भाषेतून अनुभवायचा जिवंतपणा व्यक्त होतो. याचा शोध या प्रकरणात घ्यावयाचा आहे.

5) प्रकरण पाचवे : नारायण सुर्वे यांच्या साहित्यातील समाजदर्शन

नारायण सुर्वे यांचे लेखन विविध सामाजिक अंगानी अविष्कृत झाले दु:खी, कष्टी, उपेक्षित, वंचित समाजाचे वास्तवपूर्ण चित्रण सूर्येनी केले आहे. नारायण सूर्वे यांच्या कवितेतील सामाजिकता, अधिक तीव्रतेने व्यक्त झाली आहे. अन्याय, अत्याचार व शोषणग्रस्त समाजाला युग परिवर्तनाकडे घेऊन जाण्यासाठी मानवमुक्तीचा लढा त्यांनी कवितेतून पुकारला. सामजिक बांधीलकी सुर्वेच्या कवितेतून प्रत्ययास येते. कामगार, श्रमिक वर्गाच्या समूह निष्ठेने त्यांची कविता साकार झाली आहे.

सुर्वेनी कवितेतून समाजाला वास्तवाची जाण करुन दिली व नव्या परिवर्तनासाठी मानव मुक्तीचा लढा दिला. सुर्वेंचे काव्य हे समाज संघर्ष गतिमान करणारे काव्य आहे. याचा शोध या प्रकरणात घ्यावयाचा आहे.

प्रकरण सहावे : उपसंहार व निष्कर्ष

या प्रकरणात प्रस्तुत संशोधनात घेतलेल्या सर्व प्रकरणांचा आढावा घेण्यात येणार आहे. म्हणजेच पहिल्या प्रकरणातील मराठी कवितेची वाटचाल, तसेच कवितेच्या विकासात्मक टप्याचा क्रमाने घेण्यात आलेल्या आढाव्याची चर्चा करावयाची आहे. दुसऱ्या प्रकरणातील नारायण सुर्वे यांच्या जीवनाची वाटचाल यांचा संक्षेपाने आढावा घ्यावयाचा आहे. तिसऱ्या प्रकरणातील सुर्वेच्या साहित्यातील भाषाशैली थोडक्यात अभ्यासणे, चौथ्या प्रकरणात सुर्वेच्या समग्र साहित्यात आलेल्या समाजाच्या वास्तवाचे चित्रण यांचा संक्षेप अभ्यासणे.

अशा प्रकारे सर्व प्रकरणाचा आढावा उपसंहारमध्ये घ्यावयाचा आहे. त्यानंतर अभ्यासाअंती काही प्रमुख निष्कर्ष सष्ट करण्यात येतील.

परिशिष्टे :

1) नारायण सुर्वे यांची साहित्य संपदा सूची

काव्यसंपदा : 1) ऐसा गा मी ब्रम्ह (1962)

2) माझे विद्यापीठ (1966)

3) जाहिरनामा (1975)

4) नव्या माणसाचे आगमण (1995)

गद्यलेखन : माणूस, कलावंत आणि समाज (1992)

संपादन : सनद दलित काव्यसंग्रह, कविता श्रमाची, गाणी चळवळीची ,
डॉ डांगे : भारतीय राजकारणातील एक वादळ.

अनुवादित साहित्य :

तीन गुंड आणि सात कथा, दादर पुलाकडची मुले.

संदर्भ ग्रंथ सूची :

1 डॉ. आनंद इंजेगावकर, मराठीतील बंडखोर कविता : नवाशोध, पवन प्रकाशन, परभणी.

2 डॉ. आनंद यादव, मराठी साहित्य समाज आणि संस्कृती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

3 अरुणा साबणे, साहित्यातून समाजाकडे, आकांक्षा प्रकाशन.

4 दिगांबर पाध्ये, नारायण सूर्वे यांची कविता, लोकवाड्.मयगृह प्रकाशन, मुंबइ

5 नारायण सुर्वे, ऐसा गा मी ब्रम्ह, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

6 नारायण सुर्वे, जाहीरनामा, पॉप्युलर प्रकशन, मुंबई.

7 नारायण सुर्वे, माझे विद्यापीठ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

8 नारायण सुर्वे, नव्या माणसाचे आगमन, पॉप्युलर प्रकशन, मुंबई.

9 नागनाथ कोतापल्ले (संपा.), साहित्य आणि समाज, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

10. भालचंद्र फडके, दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह, श्री विद्या प्रकाशन, पुणे.

11 मंगेश पाडगावकर, शोध कवितेचा पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

संशोधक

मीनाक्षी गंगाधर कांबळे

एम.ए, बी.एड्.एम.फिल (मराठी)

मार्गदर्शक

डॉ. माधव बसवंते

राजीव गांधी महाविद्यालय,

मुदखेड जि. नांदेड

***